

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी


• कृषि माहिती वाहिनी : (०२४५२) २२९०००, मो. ८३२९४३२०९७, ई-मेल : deevnmkv@gmail.com, deemau@rediffmail.com • फोन : (०२४५२) २२८६०१
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## १० ऑक्टोबर भाद्रपद/आश्विन शके १९४८ २०२६

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | भाद्रपद कृ. ९ शुभ दिवस<br>अविधवा नवमी<br>नवमी श्राद्ध<br>**४** | आश्विन शु. १<br>घटस्थापना<br>आश्विन मासारंभ<br>शारदीय नवरात्रारंभ<br>**११** | आश्विन शु. ७<br>**१८** | आश्विन शु. १४ शुभ दिवस<br>कोजागरी पौर्णिमा (स.११.५६ प.)<br>पौर्णिमा प्रारंभ सकाळी ११.५६<br>**२५** |
| सो सोमवार | | भाद्रपद कृ. १० शुभ दिवस (दु. २.५९ प.)<br>दशमी श्राद्ध<br>**५** | आश्विन शु. २ शुभ दिवस<br>चंद्रदर्शन<br>**१२** | आश्विन शु. ८ शुभ दिवस<br>दुर्गाष्टमी<br>महाष्टमी उपवास<br>**१९** | आश्विन पौर्णिमा शुभ दिवस<br>नवान्न पौर्णिमा<br>पौर्णिमा समाप्ती सकाळी ०९.४१<br>**२६** |
| मं मंगळवार | | भाद्रपद कृ. ११<br>इंदिरा एकादशी<br>एकादशी श्राद्ध<br>**६** | आश्विन शु. ३<br>मुस्लिम जमादिलावल मासारंभ<br>**१३** | आश्विन शु. ९ शुभ दिवस<br>महानवमी नवरात्रोत्थापन<br>अश्वपूजा विजय मुहूर्त<br>दु.१.५३ पासून २.३९ पर्यंत<br>दसरा<br>विजयादशमी<br>**२०** | आश्विन कृ. १/२<br>**२७** |
| बु बुधवार | | भाद्रपद कृ. १२<br>द्वादशी श्राद्ध<br>मघा श्राद्ध<br>**७** | आश्विन शु. ४ शुभ दिवस<br>विनायक चतुर्थी (दु. १२.१६ प.)<br>**१४** | आश्विन शु. १०<br>**२१** | आश्विन कृ. ३<br>**२८** |
| गु गुरूवार | भाद्रपद कृ. ५ शुभ दिवस<br>षष्ठी श्राद्ध<br>**१** | भाद्रपद कृ. १३<br>प्रदोष शिवरात्री<br>त्रयोदशी श्राद्ध<br>**८** | आश्विन शु. ५<br>ललिता पंचमी<br>जागतिक अंध दिन<br>**१५** | आश्विन शु. ११ शुभ दिवस<br>पाशांकुशा एकादशी (दु.२.४७ नं.)<br>**२२** | आश्विन कृ. ४ शुभ दिवस<br>संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०८.२१<br>दाशरथी चतुर्थी<br>**२९** |
| शु शुक्रवार | भाद्रपद कृ. ६<br>सप्तमी श्राद्ध<br>महात्मा गांधी जयंती<br>लाल बहादूर शास्त्री जयंती<br>**२** | भाद्रपद कृ. १४<br>चतुर्दशी श्राद्ध<br>शस्त्राने मृत झालेल्यांचे पित्र श्राद्ध<br>अमावास्या प्रारंभ रात्रौ ०९.३५<br>**९** | आश्विन शु. ६<br>सरस्वती आवाहन<br>**१६** | आश्विन शु. १२ प्रदोष<br>भारतीय कार्तिक मासारंभ<br>सौर हेमंत ऋतू प्रारंभ<br>**२३** | आश्विन कृ. ५ शुभ दिवस<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी<br>**३०** |
| श शनिवार | भाद्रपद कृ. ७/८<br>मराठी अभिजात भाषा गौरव दिन<br>कालाष्टमी अष्टमी श्राद्ध<br>मध्याष्टमी श्राद्ध<br>**३** | भाद्रपद अमावास्या<br>दर्श अमावास्या<br>अमावास्या श्राद्ध<br>अमावास्या समाप्ती रात्रौ ०९.१९<br>**१०** | आश्विन शु. ७<br>सरस्वती पूजन<br>**१७** | आश्विन शु. १३ शुभ दिवस<br>सूर्याचा स्वाती नक्षत्रप्रवेश<br>वाहन : बेडूक<br>**२४** | आश्विन कृ. ६<br>सरदार पटेल जयंती<br>**३१** |

............ १
............ २
............ ३
............ ४
............ ५
............ ६
............ ७
............ ८
............ ९
............ १०
............ ११
............ १२
............ १३
............ १४
............ १५
............ १६
............ १७
............ १८
............ १९
............ २०
............ २१
............ २२
............ २३
............ २४
............ २५
............ २६
............ २७
............ २८
............ २९
............ ३०
............ ३१

## या महिन्यातील करावयाची कामे

- कोरडवाहु रबी ज्वारीची पेरणी १० ऑक्टोबर तर हरभरा व करडईची पेरणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत संपवावी.
- सोयाबीनची काढणी वेळेवर करावी.
- रबी ज्वारीमध्ये काणी रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून गंधक ४ ग्रा. प्रतिकिलो बियाण्यास लावून बीज प्रक्रिया करावी.
- खरीप-जिरायती पिकाची निंदणी व कोळपणी करून तणाचे नियंत्रण करावे व वरखताचा हप्ता द्यावा. पावसाचा ताण पडल्यास आरक्षित पाणी द्यावे.
- बागायती व जिरायती (कोरडवाहू) कापसावरील किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीचा अवलंब करावा.
- पावसाचे प्रमाण जास्त झाल्यास ठराविक अंतरावर चर खोदून साचलेले पाणी शेताबाहेर काढावे.
- कोंबीवर्गीय भाज्याच्या लागवडीसाठी गादी वाफ्यावर पेरणी करावी.
- मिरचीच्या व कांद्याच्या रोपांची पुनर्लागवड करावी.
- जुलैमध्ये लावलेल्या भाजीपाल्यास नत्राचा दुसरा हप्ता द्यावा.
- पुर्व हंगामी उसाची लागवड १५ ऑक्टोबर पासुन करावी.
- पाऊस जास्त झाल्यास तुरीवरील मर रोगापासून बचाव करावा.
- बाजरीची अरगट रोग ग्रस्त कणसे आढळताच ती कापून नष्ट करावीत.
- पावसामध्ये खंड पडल्यास ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून येताच कीड नियंत्रणासाठी प्रभावी उपाय योजावेत.



**विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर**
* स्थापना : सन २००६ * दूरध्वनी : (०२३८२) २५१३६६



वनस्पती पेशी तंत्रज्ञान



केळी : उती तंत्रज्ञान



प्रयोगशाळा

### महत्त्वाच्या नोंदी

# हळदीवरील किडी व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन

ऑक्टोबर २०२६


डॉ.डी.डी.पटाईत
किटकशास्त्रज्ञ
मो. : ७५८८०८२०४०

डॉ.जी.डी.गडदे
विस्तार कृषिविद्यावेत्ता तथा व्यवस्थापक
मो. : ७५८८०८२१३९

श्री.एम.बी.मांडगे
वरिष्ठ संशोधन सहाय्यक
मो. : ९२८४८८६०१५

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, वनामकृवि, परभणी



हळद हे एक मसाले वर्गातील प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखले जाते. जगातील उत्पादनापैकी जवळजवळ ८० टक्के उत्पादन भारतामध्ये होते, परंतु त्यापैकी फक्त १५ ते २० टक्के हळद निर्यात होते. उत्पादनाचा विचार केला असता प्रथम क्रमांक आंध्रप्रदेशचा असून त्यानंतर ओरिसा, तामिळनाडू आसाम, कर्नाटक आणि महाराष्ट्र असा क्रम लागतो. महाराष्ट्रातील वातावरण हळद लागवडीस अतिशय अनुकूल असल्यामुळे हळदीच्या क्षेत्रात वाढ होण्यास महाराष्ट्रात वाव आहे. परंतु मागील दोन ते तीन वर्षापासून हळद पिकात वाढलेला कीड व रोगांचा प्रादुर्भाव यामुळे उत्पादनामध्ये घट आढळून येत आहे. जर या कीड आणि रोगांची वेळीच ओळख करून घेतली आणि व्यवस्थापन केले तर उत्पादनात होणारी घट काही प्रमाणात कमी करता येऊ शकते. या लेखांमध्ये आपण कीड आणि रोगांची ओळख आणि व्यवस्थापन याविषयी माहिती जाणून घेऊ.

**हळदीवरील महत्वाच्या किडी**

- खोडकिडा ● पाने गुंडाळणारी अळी
- कंदमाशी ● हुमणी
- पानातील रस शोषण करणारा ढेकुण
- खवले कीड ● सूत्रकृमी



अळी



पिकावरील लक्षणे



पतंग

**१. खोडकिडा :** ही कीड एरंडीची बोंड अळी म्हणूनही ओळखली जाते. किडीचा प्रादुर्भाव जुलै ते ऑक्टोबर या दरम्यान दिसून येतो. खोडकिडीचा पतंग आकाराने लहान व नारंगी रंगाचा असून, दोन्ही पंखांवर काळ्या रंगांचे ठिपके असतात. अळी लालसर रंगाची असून, अंगभर काळे ठिपके असतात. अळी खोड व हळदीचे कंद पोखरते. खोडाला छिद्र करून आत शिरते. आतील भाग खाऊन टाकते. पानांवर एका ओळीत छिद्र पडलेली दिसतात.

**व्यवस्थापन :-**

- जमिनीत दाणेदार किटकनाशक (कार्बोफ्युरान) मिसळावे.
- पतंग आकर्षित करून नष्ट करण्यासाठी रात्री ६ ते १० या वेळेत प्रती एकर एक या प्रमाणात प्रकाश सापळा लावावा.
- प्रादुर्भावग्रस्त झाडे जमा करून नष्ट करावीत.
- ट्रायकोग्रामा चिलोनीस ही परोपजिवी गांधीलमाशी (ट्रायकोकार्ड) ४०,००० प्रती एकर या प्रमाणात सोडावी.
- डायमिथोएट १० मिलि किंवा मॅलॅथिऑन १० मिलि प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**२. पाने गुंडाळणारी अळी :** या कीडीचा प्रादुर्भाव सर्वसाधारणपणे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होतो व नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत दिसून येतो. पतंग काळसर व पांढऱ्या रंगाचा असतो. या किडीची अळी हिरवट रंगाची असून ती अंड्यातून बाहेर पडल्यानंतर स्वतःच्या शरीराभोवती पान गुंडाळून घेते व आत राहून पाने खाते. पूर्ण वाढ झालेली अळी पानाच्या गुंडाळीतच कोषावस्थेत जाते.

**व्यवस्थापन :-**

- गुंडाळलेली पाने, अळी व कोष वेचून नष्ट करावीत.
- डायमेथोएट १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**३. कंदमाशी :** जास्त दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करते. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते ५ ते ७ दिवसांत अशा अंड्यातून लालसर रंगाच्या नवजात अळ्या बाहेर पडून उघड्या गड्ड्यामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्ड्यामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. व त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात.



प्रौढ माशी



अळी अवस्था

**व्यवस्थापन :-**

१. निरोगी कंदाचीच लागवडीसाठी निवड करावी.
२. लागवडीपुर्वी क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. १० ली.पाण्यात द्रावण करुन बियाणे १५ ते २० मिनीटे द्रावणात बुडवावीत.
३. पीक तण विरहित ठेवावे.
४. जुलै ते ऑक्टोंबर दरम्यान प्रत्येक १५ दिवसांच्या अंतराने क्विनॉलफॉस (२५% प्रवाही) २० मि.ली. किंवा डायमिथोएट (३०% प्रवाही ) १५ मि.ली. यापैकी एका कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे झाडावर आलटून पालटून फवारणी करावी व सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळावे.
५. उघडे पडेलेल्या कंदाजवळ कंदमाशीची मादी अंडी घालते त्यामुळे उघडे पडलेले कंद मातीने वेळोवेळी झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी.तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने कीटकनाशकाची आळवणी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात निश्चित करावी.
६. जमीनीत पिकाच्या १० ते १५ से.मी.अंतरावर दाणेदार कार्बोफ्युरान ३ जी., २० ते २५ कि.ग्रॅ/ हेक्टर, ५ ते ७ से.मी. खोलवर मिसळावे. तसेच पेरणी नंतर १०५ त १३५ दिवसानंतर त्यांचा उपयोग करता येतो.
७. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद नष्ट करावेत.
८. एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंडीचे बी २०० ग्रॅम घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात.
९. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी करावी.

अशाप्रकारे कंद माशीच्या प्रादुर्भावास वेळीच लक्ष देऊन व्यवस्थापनविषयी योग्य उपाययोजना करून भविष्यात होणारे नुकसान टाळावे.

**४. हुमणी :** या कीडीची अळी नुकसानकारक असून सुरुवातीचे काही दिवस सेंद्रिय पदार्थांवर उपजीविका करते. पुढे मुळे कुरतडतात. जास्त प्रादुर्भाव झालेल्या भागात कंदही कुरतडल्याचे दिसून येते. मुळे कुरतडल्यामुळे हळदीचे पीक पिवळे पडते.रोपे वाळू लागतात.उपटल्यास ती सहज उपटतात

**व्यवस्थापन :-**

- चांगले कुजलेले शेणखत शेतात टाकावे.
- क्लोरपायरीफॉस २० टक्के ३० मिली १० लिटर पाण्यात टाकुन आळवणी करावी.
- परोपजिवी बुरशी मेटारायझीयम निसोपली ४ किलो प्रति एकरी या प्रमाणात वापरावे

**५. पानातील रस शोषण करणारा ढेकुण :** या किडीची पिल्ले पानाच्या पाठीमागे एकत्रित राहून पानातील रस शोषण करतात. प्रादुर्भावग्रस्त पाने तांबूस पिवळसर रंगाची दिसून येतात.

**व्यवस्थापन :**

- लागवडीसाठी निरोगी बेणे वापरावे.
- पीक तणविरहित ठेवावे.
- हळदकंद मॅलाथिऑन (५ मिलि / लिटर पाणी) द्रावणात ३० मिनिटे बुडवून व त्यानंतर सुकवून लागवड अथवा साठवणुक करावी.
- डायमेथोएट १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**६. खवले कीड :** शेतात झाडातील व साठवणीत कंदातील रस शोषण करतात, परिणामी ते सुकतात आणि कोरडे होतात. तसेच कंदावर पांढरे डाग दिसतात.प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या टप्प्यात, पांढऱ्या रंगाचे खवले कीड कंदावर विखुरलेले दिसतात आणि नंतर ते वाढत्या कोंबाजवळ एकत्र येतात. जेव्हा प्रादुर्भाव तीव्र असतो तेव्हा कंद आणि कोंब सुकतात आणि शेवटी संपूर्ण कोंब सुकते.

**व्यवस्थापन :-**

- लागवडीसाठी निरोगी बेणे वापरावे
- हळद कंद मॅलाथिऑन (५ मिलि / लिटर पाणी) द्रावणात ३० मिनिटे बुडवून व त्यानंतर सुकवून लागवड अथवा साठवणुक करावी.
- डायमेथोएट १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**७. सूत्रकृमी :** ही मुळावरील कीड अतिशय सूक्ष्म असून, डोळ्यांना दिसत नाही. ती हळदीच्या मुळांवर गाठी तयार करते. जमिनित पिकांच्या मुळाभोवती राहून सुईसारख्या अवयवाने मुळातील रस शोषून घेते. पिकांची वाढ खुंटते. प्रथम पिकाचा शेंडा मलूल होवून पिके पिवळी पडून झाड मरते. कालांतराने हळदीच्या कंदामध्ये प्रवेश करते. परिणामी कंद सडू लागतो.

**व्यवस्थापन :-**

- कमीत कमी ६० दिवस जमीन उन्हाळ्यात तळपून द्यावी.
- सूत्रकृमीच्या व्यवस्थापनाकरिता जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा भुकटी ४ किलो प्रति एकरी २५० किलो शेणखतामध्ये मिसळून वापरावी. अथवा शिफारशीत कीटकनाशकाचा जमिनीत योग्य प्रमाणात वापर करावा.
- भरणी करताना निंबोळी पेंड ८ क्विंटल प्रति एकरी या प्रमाणात वापरावी.
- हळद पिकांत झेंडू सूत्रकृमींसाठी सापळा पीक म्हणून लावावे.

**हळदीमधील कंदकुज, पानावरील ठिपके आणि करपा रोगाचे व्यवस्थापन**

**१.कंदकुज (रायझोम रॉट)-** कंदकुजीमुळे हळद पिकाचे ३० ते ३५ टक्के नुकसान होते. कंदकुजीत प्रामुख्याने पिथीयम ग्रामीनी, ॲस्परजीलस या बुरशी सक्रीय असतात. कंद कुजचे प्रमुख लक्षण म्हणजे पाने कडापासुन वाळु लागतात व मुळे कुजतात.



**व्यवस्थापन**

१. कंदकुज करीता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकरी २ ते २.५ किलो ट्रायकोडर्मा शेणखतामध्ये मिसळून जमिनीतून द्यावे.
२. जास्त पावसामुळे शेतात साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा वेळोवेळी निचरा करावा. जेणेकरून कंदकुज होण्यास कारणीभूत असलेल्या बुरशीचा प्रसार कमी करता येईल.
३. कंदकूज झाली असल्यास जमिनीतून कार्बेडेंझीम ५०% -१ ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के -३ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५० टक्के -५ ग्रॅम यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति लिटर पाण्यात मिसळून दरवेळी महिन्यातून एकदा आळवणी करावी.

(आळवणी करताना जमिनीमध्ये वापसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकास पाण्याचा थोडा ताण द्यावा.)

टीप : हळद पिकावर केंद्रीय कीटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेमि नसल्याने विद्यापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत.

**२.पानावरील ठिपके/टिक्का-** या रोगाचा प्रादुर्भाव आर्द्रता वाढल्यामुळे सप्टेंबर महिन्यात दिसु लागतो. हळद शेंड्याकडे पिवळी दिसते व खालील पानाच्या पृष्ठभागावर मुख्य शिरेच्या बाजुने लालसर करड्या रंगाचे १ ते २ सें.मी. व्यासाचे ठिपके दिसतात त्यामुळे पाने वाळतात.



**३) पर्ण करपा :** हळदीच्या पानावर लंबगोल तपकिरी ठिपके दिसतात व ठिपक्यामध्ये वर्तुळे दिसतात. त्यामुळे झाडाच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात घट येऊ शकते.



**पानावरील ठिपके व करपा रोगाचे व्यवस्थापन :**

**प्रादुर्भाव कमी असल्यास**

कार्बेडेंझीम ५० टक्के - ४०० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के -५०० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५० टक्के - ५०० ग्रॅम यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी.

**प्रादुर्भाव जास्त असल्यास**

एजोक्सिस्ट्रोबीन १८.२ टक्के + डायफेनोकोनॅझोल ११.४ टक्के (पूर्वमिश्रित बुरशीनाशक) - २०० मिली किंवा प्रोपीकोनॅझोल २५ टक्के - २०० मिली किंवा क्लोरोथॅलोनील ७५ टक्के - ५०० ग्रॅम यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी.

**फवारणी करताना घ्यावयाची विशेष काळजी:-**

- कुठलीही फवारणी करताना पावसाचा अंदाज घेऊनच फवारणी करावी
- वरील कीटकनाशका सोबत कुठल्याही प्रकारचे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते,सूक्ष्म मूलद्रव्ये अथवा रसायने मिसळू नये.
- लागोपाठ एकच एक कीटकनाशक फवारू नये
- फवारणी करिता दुषित पाणी न वापरता स्वच्छ पाणी वापरावे आणि पाण्याचे प्रमाण शिफारसितच वापरावे, कमी पाणी वापरल्यास फवारणीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाही
- किडनाशके फवारणी करताना योग्य ती संरक्षक विषयी काळजी घ्यावी

**कीड व रोग व्यवस्थापनच्या थोडक्यात महत्त्वाच्या बाबी**

- उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी.
- कमीत कमी ६० दिवस जमीन उन्हाळ्यात तळपून द्यावी.
- हळदीची लागवड बेडवर करावी
- लागवडीसाठी निरोगी बेणे वापरावे.
- निंबोळी पेंडेचा वापर आवश्य करावा.
- लागवडीवेळी बेण्यास कीटकनाशकाची आणि बुरशीनाशकाची प्रक्रिया करूनच लागवड करावी.
- पीक वेळोवेळी तण विरहित ठेवावे
- हळद पिकात पाणी साचू देऊ नये.
- वेळोवेळी चर काढून साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.
- शिफारशीत वेळेत हळदीची भरणी करावी, त्यामुळे रोग-किडींपासून हळद पिकाचा बचाव होतो.
- वेळोवेळी किडीने व रोगाने प्रादुर्भावग्रस्त पिकांचे अवशेष जमा करून नष्ट करावेत.
- कंदमाशीचा आणि हुमणी किडीचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी शक्यतो सर्व शेतकऱ्यांनी मिळून कमीत कमी २ ते ३ वर्षेसामुदायिकपणे कंदमाशीचे नियंत्रण करावे.
- हळदीनंतर परत हळद किंवा आले यांसारखी पिके सलग त्याच क्षेत्रामध्ये घेऊ नयेत. पिकांचा फेरपालट करावा.
- कीटकनाशकाचा वापर आलटून पालटून करावा.
- एकापेक्षा जास्त कीटकनाशकाचा वापर मिसळून वापर टाळावा.
- फवारणी करताना दरवेळी उच्च दर्जाच्या स्टिकरचा वापर करावा.
- जैविक निविष्ठाचा वापर मोठ्या प्रमाणात करावा.

✻ ✻ ✻ ✻ ✻